RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२१५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि.२३ सप्टेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## तिरुपती बालाजी मंदिराचे शुद्धीकरण भगवान व्यंकटेश्वर स्वामींची मागितली माफी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३तिरुपती**

आंध्र प्रदेशातील जगप्रसिद्ध तिरुपती बालाजी मंदिरातील प्रसादाच्या लाडूमध्ये प्राण्यांची चरबी वापरल्याने देशभरातील भाविक तीव्र संताप व्यक्त करत आहेत. या घटनेनंतर देशातील अनेक मंदिरांनी देवाला बाहेरुन येणाऱ्या प्रसादावर बंदी घातली आहे. दरम्यान, बालाजी मंदिरातील लाडूच्या वादानंतर आता सोमवारी (२३ सप्टेंबर) तिरुपती बालाजी मंदिराचे शुद्धीकरण करण्यात आले. या पूजेवेळी मंत्रोच्चाराद्वारे भगवान व्यंकटेश्वर स्वामींची क्षमा मागण्यात आली.





तिरुमला तिरुपती देवस्थानम् ने या महाशांती होममचे आयोजन केले होते. मंदिराकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, ४ तास हा शुद्धीकरण कार्यक्रम चालला. या कार्यक्रमात मंदिराच्या पुजाऱ्यांसह टीटीडीचे अधिकारीही सहभागी झाले होते. यानंतर तिरुपतीच्या प्रसिद्ध 'लाडू प्रसादम्'ला पुन्हा पावित्र्य बहाल करण्यात आल्याचेही टीटीडीने म्हटले आहे. टीटीडीने सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले की, 'श्रीवारी लाडूचे पावित्र्य आता निर्विवाद आहे. सर्व भक्तांच्या समाधानासाठी लाडू प्रसादमचे पावित्र्य कायम राखण्यासाठी देवस्थान वचनबद्ध आहे.'

**सुप्रीम कोर्टात याचिकाही दाखल**

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू यांनी रविवारी (२२ सप्टेंबर) मंदिराच्या पावित्र्याचे उल्लंघन केल्याबद्दल मागील वायएसआरसीपी सरकारवर निशाणा साधला. टीडीपीचे प्रमुख चंद्राबाबू नायडू यांनी आरोप केला की, मागील जगन मोहन रेड्डी सरकारच्या काळात टीटीडीने तूप खरेदी करण्याच्या प्रक्रियेत बदल केला होता. सीएम नायडू यांनीही या प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटी स्थापन करण्याची घोषणा केली आहे. दरम्यान, याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयातही याचिका दाखल करण्यात आली आहे.

## ''विदर्भाच्या राजा ची'' .... शिस्तीत आणि मस्तीत निघाली विसर्जन मिरवणूक



अमरावती शहराचा नव्हे तर संपूर्ण विदर्भात नावलौकिक असणाऱ्या विदर्भाच्या राजाची भव्य विसर्जन मिरवणूक आज इर्विन चौक येथून सुरुवात झाली आहे. मिरवणुकीत मंडळाचे शेकडो कार्यकर्ते पदाधिकारी, स्वयंस्फूर्तीने सेवा देणारे स्वयंसेवक शहरातील १३ ढोल-ताशे पथके, ग्रामीण भागातून येणारे ४ संदल पथके, २ दिंड्या, भजनी मंडळे व ६ देखावे सहभागी झाले आहेत. राजकमल चौकात रात्री ८ वाजता विदर्भाच्या राजाची महाआरती होणार आहे. याप्रसंगी देखण्या 'फायर शो'चे आयोजन करण्यात आल्याची माहिती न्यू आझाद गणेशोत्सव मंडळाद्वारे देण्यात आली. इर्विन चौक, मच्र्युरी टी पॉइंट, रेल्वे स्टेशन चौक, रेल्वे ओव्हरब्रिज, राजकमल चौक, श्याम चौक, जयस्तंभ चौक, दीपक चौक, चौधरी चौक, मोसिकॉट जिनिंग प्रेसिंग असा राहणार आहे. या मिरवणुकीदरम्यान ठिकठिकाणी भाविकांद्वारे प्रसाद, सरबत, पाणी, शीतपेय, मसाले भात, लाडू, मोदकाचे वाटप केले जात आहे.

## अकोल्यात औरंगजेब संघटनेकडून दहशतवाद्यांचे आणि परकीय आक्रमकांचे पोस्टर्स

### मविआचे सोयीस्कर मौन! शिवराय कुळकर्णी यांची कारवाईची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २३ अमरावती**

उद्धव ठाकरे, शरद पवार आणि काँग्रेसच्या महाविकास आघाडीने गठ्ठा मतदानासाठी सुरू केलेल्या मुस्लिम अनुनयाचे पडसाद गंभीर व चिंताजनक स्वरूपात महाराष्ट्रात उमटत असून अकोल्याला ईदच्या मिरवणुकीत ज्यांच्या तस्वीरी नाचवल्या गेल्या ते देशहितासाठी घातक आहे. या अलगाववादी व जिहादी मानसिकतेचे महाविकास आघाडी समर्थन करणार काय, असा सवाल भाजपाचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी यांनी उपस्थित केला आहे.अकोला येथील ईदच्या मिरवणुकीत भारताला पारतंत्र्यात नेणाऱ्या मोगल शासकांच्या प्रतिमा प्रकर्षाने नाचवण्यात आल्या. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात सुलतान औरंगजेब ऑर्गनायझेशनच्या नावाखाली ईद साजरी करणे चिंताजनक आहे. ठिकठिकाणी गणपती मिरवणुकांवर झालेल्या दगडफेकीचा महाविकास आघाडीने निषेध केलेला नाही. आता अकोल्यातील ईदच्या जुलूस मध्ये प्रकर्षाने दिसलेल्या मोहम्मद अली जिना मानसिकतेला शरद पवार, उद्धव ठाकरे आणि काँग्रेस कारणीभूत असल्याची टीका शिवराय कुळकर्णी यांनी केली आहे.भारताला गुलामीत ठेवलेले सुलतान भारताच्या मुसलमानांचे आदर्श असल्याचे अकोल्याच्या ईदच्या जुलूसमध्ये आवर्जून दर्शविण्यात आले. भारताशिवाय जगात जे इस्लामिक कट्टरवादी म्हणून नावारूपास आले, त्यांचे पोस्टर्सही अकोल्यात मोठ्या प्रमाणात लावण्यात आले. जुलूसच्या मार्गावर अल्जेरियन गुन्हेगार, इस्लामिक कट्टरपंथी हमजा बेंडेलादाज याचे पोस्टर होते. हमजावर अमेरिकेतील २१७ बँक आणि वित्तीय संस्था मधील खाजगी खाती हॅक करीत लाखो अमेरिकी डॉलर चोरल्याचा आरोप आहे. लॉयन ऑफ अल्जेरिया लिहून हमजा



बेंडेलादाज या जिहादी गुन्हेगाराचे पोस्टर ठिकठिकाणी लावण्यात आले होते. हमास चा प्रवक्ता अबू आबेदा याचे पोस्टर 'रियल हिरो' म्हणून नाचवले जात होते. लिबियातील कट्टर ओमर अल मुख्तार, भारतावर सहा वेळा आक्रमण केलेला आणि पानिपत मध्ये मराठे ज्याच्याशी लढले तो अहमद शाह अब्दाली, गुजराथ मार्गे ज्याने भारतावर आक्रमण केले आणि पृथ्वीराज चव्हाण ज्याच्याशी लढले तो शहाबुद्दीन मोहम्मद घोरी अशा परकीय आक्रमकांच्या तस्वीरी जुलूसच्या मार्गावर लावण्यात आल्या होत्या. भारताला गुलाम बनवलेल्या परकीय आक्रमकांना स्वतःचे पूर्वज म्हणून गौरवण्याची जिहादी मानसिकता अकोल्यात पाहायला मिळाली. या मिरवणुकीचे रील महाराष्ट्रात इतरत्र प्रसारित होत आहेत. अफगाण एमपायरचा आणि पॅलेस्टाईनच्या ध्वजाचा गौरव कशाचे द्योतक आहे ? जगभरातील दहशतवादी व त्यांच्या संघटना भारतातील मुसलमानांचे प्रेरणास्थान असणे ही मोठी धोक्याची नांदी असल्याचे स्पष्ट करून या औरंगजेबी संघटनेवर कारवाईची मागणी शिवराय कुळकर्णी यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे केली आहे. मात्र, जुलूस सुरू असताना गठ्ठा मतांसाठी हा आक्षेपार्ह प्रकार मूकपणे पाहून त्याला खतपाणी घालणाऱ्या महाविकास आघाडीचा शिवराय कुळकर्णी यांनी निषेध केला आहे.

## 'उद्धव ठाकरेंना बाहेर काढायचा प्रयत्न काँग्रेस करतंय'; चंद्रशेखर बावनकुळेंचा मोठा दावा

**विदर्भ प्रजसत्ताक दि.२३नागपूर**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांना विधानसभा निवडणुकीआधी महायुतीतून बाहेर काढणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत. यावरुन राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. यावर आथा भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली. 'उद्धव ठाकरे आणि काँग्रेसचे पे वर्कर अजित पवार यांना आम्ही महायुतीतून बाहेर काढतोय, ते बाहेर जाणार आहे, हे सर्व नॅरेटीव्ह सेट करत आहेत. त्यांनी यासाठी मोठ मोठ्या वॉर रुम केल्या आहेत. त्यातून अशा बातम्या सोडल्या जातात. या उलट उद्धव ठाकरेंना बाहेर काढण्यासाठी काँग्रेस प्रयत्न करत आहे, असा दावा भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला.



चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, ठाकरे गटाचे प्रवक्ते उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्रिपदाबाबत बोलत आहेत. पण, महाविकास आघाडीमध्ये बाकीच्या लोकांना हे मान्य नाही. उलट महाविकास आघाडीतून उद्धव ठाकरे यांना बाहेर काढण्याच्या चर्चा विदर्भात सुरू आहेत. नागपुरात तर ठाकरेंना कोण जागाही द्यायला तयार नाही. काल काँग्रेसने बारा जागांवर दावाही केला. उपराजधानीमध्ये उद्धव ठाकरे यांना एकही जागा मिळणार नाही. याचा अर्थ काय?, असा सवालही चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला.

**'नागपुरात ठाकरेंना एकही जागा देणार नाहीत'**

उद्धव ठाकरेंना आम्ही नाागपुरात तीन जागा दिल्या होत्या, आता ठाकरेंना एकही जागा देणार नाही असं काँग्रेसने सांगितलं आहे. आता हळूहळू ठाकरेंना महाविकास आघाडीतून बाहेर काढत आहे, असा टोलाही बावनकुळे यांनी लगावला. आम्ही शरद पवार यांना धक्का मारु, उद्धव ठाकरे यांना धक्का मारु आणि आमचा मुख्यमंत्री करु असा सुतोवाच एका काँग्रेसच्या जबाबदार नेत्यांनी केला आहे, असंही बावनकुळे म्हणाले. आमच्याकडे महायुती पक्की आहे, आमची समन्वय समिती असणार आहे. तीन नेत्यांची समन्वय समिती असणार आहे, लोकसभेला ज्या चुका झाल्या. त्या चुका विधानसभेला करायच्या नाहीत, त्यासाठी आम्ही समिती स्थापन करणार आहे, असंही बावनकुळे म्हणाले.

## मिस्टर संभाजी भोसले, ही रयत तुम्हाला राजा मानणार नाही; लक्ष्मण हाकेंची बोचरी टीका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३वडीगोद्री**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे, सगेसोयरेची अंमलबजावणी व्हावी, यासह अन्य मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषण सुरू केले आहे. तर कुणबी प्रमाणपत्रांमुळे ओबीसी आरक्षणाला धक्का लागत आहे. त्यामुळे ही प्रमाणपत्रे रद्द करावीत, तसेच ओबीसी आरक्षणाला धक्का लागू नये, यासाठी दोन किमी अंतरावर वडीगोद्री येथे ओबीसी समाजाने आंदोलन, उपोषण सुरू केले आहे. याचे नेतृत्व लक्ष्मण हाके करत आहेत. संभाजीराजे छत्रपती यांनी





मराठा आंदोलक मनोज जरांगे यांची भेट घेतली. यावरून लक्ष्मण हाके यांनी संभाजीराजेंवर जोरदार टीका केली आहे.


१७ सप्टेंबरपासून उपोषणाला बसलेल्या जरांगे पाटलांची प्रकृती खालावली असून, संभाजीराजे छत्रपती यांनी त्यांची आज भेट घेतली. त्यांच्या प्रकृतीबद्दल संभाजीराजेंनी चिंता व्यक्त केली. ही काय पद्धत आहे? तिकडे (सरकारकडे) मेडिकल रिपोर्ट जातो. मेडिकल रिपोर्ट इतका वाईट आहे. काहीही होऊ शकतं. त्याला तुम्ही जबाबदार असाल, असा इशारा संभाजीराजेंनी महायुती सरकारला दिला. यानंतर लक्ष्मण हाकेंनी संभाजी राजेंवर जोरदार हल्लाबोल केला.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे राज्य निर्माण होण्यासाठी अठरापगड जातींनी जीवाची पर्वा केली नाही. आरक्षणाचे जनक छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारांचे आम्ही पाईक आहोत. संभाजीराजे छत्रपती यांना शोषितांचा कळवळा नाही. मनोज जरांगे यांचे आंदोलन राजकारणासाठीच आहे. मराठवाड्यातील बारा बलुतेदारांच्या दुकानावर हल्ले झाले, नाभिक समाजाच्या लोकांच्या दुकानांवरती हल्ले झाले, हे कशात बसते? संभाजी राजे तुम्हाला राजे म्हणायला लाज वाटते. तुम्ही छत्रपती शाहू राजांचे आणि शिवरायांचे वारस नाहीत. मिस्टर संभाजी भोसले, ही रयत तुम्हाला राजा मानणार नाही, या शब्दांत लक्ष्मण हाके यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. दरम्यान, मिस्टर संभाजी भोसले विशाळगडावरती माझ्या मुस्लिम माता-माऊली लढत होत्या, तेव्हा तुम्ही हात वर करून चिथावणी देत होता. त्या जरांगेंनी त्याच्या बॅनर छत्रपती शाहू महाराजांची प्रतिमा वापरली आहे का? आम्ही एका जातीची मागणी करत नाही. संभाजी भोसले तुम्हाला आम्ही राजे का म्हणायचे? छत्रपती शिवरायांच्या शाहू महाराजांचा वैचारिक वारसा असता तर तुम्ही या आंदोलनात भेट दिली असती. इथून पुढे ओबीसीची जनता तुम्हाला राजा म्हणणार नाही, अशी टीका लक्ष्मण हाके यांनी म्हटले आहे.

## किरण रावची स्वप्नपूर्ती! भारताकडून 'लापता लेडीज' ऑस्करसाठी नॉमिनेट; २९ चित्रपटांमधून निवड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३ मुंबई**

किरण राव दिग्दर्शित 'लापता लेडीज' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर घवघवीत यश मिळवलं होतं. चित्रपट समीक्षकांपासून ते बॉलीवूडप्रेमींपर्यंत प्रत्येकाला या सिनेमाची अनोखी गोष्ट भावली होती. अखेर किरण रावच्या प्रयत्नांना मोठं यश मिळालं आहे. 'फिल्म फेडरेशन ऑफ इंडिया'ने 'लापता लेडीज' हा चित्रपट ऑस्करसाठी भारताची अधिकृत प्रवेशिका म्हणून




पाठवला आहे.

९७ व्या अकादमी पुरस्कारांसाठी म्हणजेच 'ऑस्कर २०२५' साठी भारताकडून 'लापता लेडीज'ची निवड करण्यात आली आहे. सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय ( विदेशी ) चित्रपट श्रेणीसाठी 'लापता लेडीज' या चित्रपटाला भारताकडून नामांकन मिळालं आहे. यासंदर्भात 'द फिल्म फेडरेशन ऑफ इंडिया'च्या सदस्यांनी अकादमी पुरस्कारांसाठी भारताच्या अधिकृत प्रवेशाची घोषणा केली आहे.फिल्म फेडरेशनकडून लापता लेडीजसह एकूण २९ चित्रपट पाठवण्यात आले होते. यात रणबीर कपूरचा 'निमल', कार्तिक आर्यनचा 'चंदू चॅम्पियन', प्रभासचा 'कल्की २८९८ एडी', मल्याळम चित्रपट 'आट्टम', राजकुमार रावचा 'श्रीकांत', कान्स फेस्टिव्हलमध्ये बाजी मारणाऱ्या 'ऑल वी इमेजिन ज लाइट' यांसारख्या चित्रपटांचा या २९ चित्रपटांच्या यादीत समावेश होता. मात्र, आमिर खानच्या प्रोडक्शनची निर्मिती असलेल्या 'लापता लेडीज'ने यात बाजी मारली आहे.किरण आनंद व्यक्त करत म्हणाली, आमचा 'लापता लेडीज' हा चित्रपट अकादमी पुरस्कारांसाठी भारताची अधिकृत प्रवेशिका म्हणून निवडला गेला याचा मला खूप आनंद होत आहे. माझ्या संपूर्ण टीमच्या अथक परिश्रमामुळे आज हे यश आम्हाला मिळालं आहे. मला आशा आहे की, हा चित्रपट भारताप्रमाणेच जगभरातील प्रेक्षकांच्या पसंतीस उतरेल.

## सरपंच-उपसरपंचांच्या वेतनात वाढ, ग्रामसेवक पदाचं नाव बदललं

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३मुंबई**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यास अवघे काही दिवस बाकी असताना होत असलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत नेमके काय निर्णय घेण्यात येणार, याबाबत उत्सुकता होती. आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत सरपंच-उपसरपंचांचे वेतन वाढवण्यासह अनेक मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी याबाबतची माहिती दिली आहे.



राज्यातील सरपंच आणि उपसरपंचांच्या वेतनात दुप्पटीने वाढ करण्यात आली आहे. तसंच ग्रामसेवकपदाचं नाव बदलून ग्रामविकास अधिकारी असं करण्यात आलं असल्याचंही मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितलं आहे.दरम्यान, आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत जळगाव जिल्ह्यातील विकासकामांनाही गती देण्यात आल्याची माहिती गिरीश महाजन यांनी दिली असून जळगावमध्ये क्रीडा संकुलाला मंजुरी देण्यात आली असल्याचं ते म्हणाले. या क्रीडा संकुलासाठी राज्य सरकारकडून अडीचशे कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

संपादकीय ......

# एकत्रित निवडणुकांचे आव्हान

माजी राष्ट्रपतींच्या अध्यक्षतेखालील समिती नियुक्त करून मोदी सरकारने 'एक देश एक निवडणुकी'च्या मुद्द्याबाबतची गंभीर भूमिका गतवर्षीच स्पष्ट केली होती. या समितीचा अहवाल स्वीकारून त्यातील शिफारशींना केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. तूर्त लोकसभा आणि राज्यसभेत याबाबतचे विधेयक पास करून घेणे, हे मोठे आव्हान असेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या तिसर्या कार्यकाळाचे १०० दिवस पूर्ण झाल्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यापैकी एक म्हणजे केंद्रीय मंत्रिमंडळाने 'एक देश एक निवडणुकी'चा प्रस्ताव स्वीकारला असून, त्यास मंजुरीही दिली आहे. केंद्रीय माहिती व प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नुकतीच यासंदर्भातील माहिती जाहीर केली आहे. वेळोवेळी देशात एकत्र निवडणुका घेण्यासंबंधी सल्ले दिले जातात. त्यासाठीच माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती गठित केली होती. या समितीने सर्व राजकीय पक्ष, अनेक न्यायाधीश आणि विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांशी चर्चा करून हा अहवाल तयार केला आहे, असेही त्यांनी सांगितले. १९५१ ते १९६७ पर्यंत निवडणुका एकत्रच होत असत. त्यानंतर १९९९ मध्ये विधी आयोगानेही देशात एकत्र निवडणुका घेण्यात याव्यात, जेणेकरून देशातील विकासकामांमध्ये खंड पडणार नाही, अशी शिफारस केली होती. कोविंद समितीने एकूण ६२ राजकीय पक्षांकडे एक राष्ट्र, एक निवडणुकीवर मत मागितले होते. यामध्ये ४७ पक्षांनी त्यांची बाजू मांडली असून, ३२ पक्षांनी कोविंद समितीच्या शिफारशींचे समर्थन केले, तर १५ पक्षांनी विरोध केला आहे.

पंतप्रधान मोदी यांनी केंद्रात सरकार आल्यानंतर लगेच 'वन नेशन वन इलेक्शन'वर चर्चा करण्याचे आवाहन केले होते. भाजपच्या २०१४ च्या जाहीरनाम्यातही त्याचा उल्लेख आहे. पंतप्रधान मोदी यांच्याकडून २०१५ पासून या गोष्टीवर मंथन केले जात आहे आणि त्यावर चर्चाही झाली आहे. सर्वप्रथम १९९९ मध्ये कायदा आयोगाने अहवालात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाचवेळी घेण्याचा मुद्दा मांडला. त्यात यासंदर्भात काही मुद्देही जोडले होते. २०१५ मध्ये कार्मिक लोक तक्रार, कायदा आणि न्याय व्यवहार संसदीय समितीनेही एक निवडणुकीची शिफारस केली. ऑगस्ट २०१८ मध्ये पुन्हा कायदा आयोगाचा अहवाल आला आणि त्यात दोन टप्प्यांत निवडणुका घेण्याची शिफारस केली. डिसेंबर २०२२ मध्ये पुन्हा कायदा आयोगाने एकाच वेळी निवडणुका घेण्याच्या प्रस्तावावर राष्ट्रीय पक्ष, निवडणूक आयोग, नोकरशहा, शिक्षक आणि तज्ज्ञ तसेच प्रतिष्ठित लोकांकडून मत मागितले होते. या सर्वांना २०१७ च्या नीती आयोगाचा अभ्यास अहवाल शेअर केला होता आणि त्यात त्यांनी संसदीय समितीच्या दोन टप्प्यांत निवडणुका घेण्याचे मान्य केलेले होते.

कायदा आयोगाने २०१८ रोजी अहवालात वेगवेगळ्या निवडणुकीच्या खर्चांचे आकलन करत एकच वेळी निवडणुका घेतल्याने मोठ्या प्रमाणात पैसा वाचेल, असे सांगितले होते. निवडणुका पालिकेच्या असोत, विधानसभेच्या असोत किंवा राष्ट्रीय राजकारणातील असोत, संसदेतील खासदारही त्यापासून वेगळे राहत नाहीत. संबंधित राष्ट्रीय पक्षही राज्याच्या निवडणुकांचे हित पाहता भूमिका ठरवतात आणि जनतेसमोर अजेंडा मांडतात. आचारसंहिता लागू केल्यानंतर सरकारकडून नवीन घोषणा केल्या जात नाहीत आणि जुन्या योजनांवर कोणतीही स्थगिती आणली जात नाही. जनहिताच्या निर्णयासाठी सरकारला निवडणूक आयोगाची परवानगी घ्यावी लागते. अशावेळी सरकारच्या कामकाजावर प्रतिकूल परिणाम होतो आणि ही बाब चांगली नाही. अर्थात, निवडणुकीच्या काळात जिल्हा प्रशासन निष्पक्ष निवडणुका करण्यासाठी कटिबद्ध असते आणि त्यासाठी शिक्षक आणि अन्य कर्मचार्यांना कामावर घेतले जाते. परिणामी, शाळांतील शिक्षणाच्या प्रक्रियेवरही याचा परिणाम होतो. सरकारी कार्यालयांतील कामकाजही मंदावते. यामुळे विकासाची चाके मंदावतात. प्रत्येक वर्षी भारतात सरासरी चार राज्यांच्या विधानसभा निवडणुका होतात. त्याचबरोबर स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका असतातच. लोकसभा, विधानसभा आणि पालिकांच्या निवडणुकांच्या काळात लागू होणार्या आचारसंहितेमुळे विकासकामांवर किती परिणाम झाला आहे, याचा विचार करायलाच हवा.

माजी मुख्य निवडणूक आयुक्त एस. वाय. कुरेशी यांच्या मते, 'वन नेशन वन इलेक्शन'ची संकल्पना ऐकण्यास आणि कल्पना करण्यास चांगली वाटते; मात्र भारतासारख्या देशात लागू करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागू शकतो. कारण, देशात अनेक राज्यांत भौगोलिक, सामाजिक वैविध्यपणा असून, प्रत्येक राज्यातील राजकीय स्थिती ही वेगळी आहे. एखाद्या राज्यात प्रादेशिक पक्ष मजबूत आहे, तर काही राज्यांत राष्ट्रीय पक्ष आणि प्रादेशिक पक्ष यांच्यात संघर्ष आहे. काही ठिकाणी आघाडीचे सरकार आहे. अशा वेळी जर राज्यातले आघाडीचे सरकार काही महिन्यांतच कोसळले तर लोकसभेसाठी थांबणार का, असा प्रश्न आहे. नव्याने निवडणुका घेईपर्यंत राज्याचे शासन कोण चालवणार, हासुद्धा प्रश्न आहे. निवडणुका होईपर्यंत राज्यात राष्ट्रपती राजवट लागू राहील का, याचाही विचार करावा लागेल; कारण कोणत्याही राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्यासाठी काळाची मर्यादा आखून दिली आहे. या सर्व प्रश्नांवर विचार करावा लागेल. याशिवाय ज्या राज्यांत सरकार नुकतेच स्थापन झाले असेल, तर तेथे एकाच वेळी निवडणुका घेण्यासाठी सरकार बरखास्त केले जाणार का? यास राज्यात सत्तेत असणारे पक्ष तयार होतील का? अशा वेळी लोकसभा आणि विधानसभेत कोणत्याच पक्षाला बहुमत न मिळणे, पक्षांतरामुळे सरकार पडणे किंवा कोणत्याही पक्षांकडून सरकार स्थापन करण्याचा दावा न करणे, अशी स्थिती निर्माण होऊ शकते.

# डोके बधिर, कान किर्रर्र

वाजत गाजत निघालेल्या गणेश विसर्जन मिरवणुकीचे परिणाम समोर येण्यास सुरुवात झाली आहे. माणसाच्या कानाला सहन होणार नाही इतक्या मोठ्या आवाजात वाजलेले डीजे आणि लेसरची तीव्र प्रकाश फेकणारी किरणे यांचा अपेक्षित परिणाम झालेला दिसून येत आहे. हे लोण छोट्या-मोठ्या शहरांमध्ये पसरल्यामुळे तिथेही इतकेच दणदणाट करणारे तीव्र आवाज या मिरवणुकीमध्ये होते. महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये या आवाजामुळे मृत्यू झाल्याच्या घटना पण घडल्या आहेत. हृदयासंबंधी काही विकार असणार्या लोकांचे हृदय या आवाजामुळे थरथरत असते. तुम्ही एखाद्या वाहनातून जात आहात आणि बाजूने मिरवणूक जात असेल तर चक्क ते वाहन आणि त्यातील सर्व व्यक्ती थरथर करत असतात. साहजिकच याचा झटका हृदयाला बसतो आणि त्यामुळे हृदयविकाराच्या घटना पण आढळून आल्या आहेत. हे असे सर्व काही होणार हे माहीत असूनही मिरवणुकीतील कार्यकर्ते जास्तीत जास्त आवाज काढत बेधुंद होऊन संगीताच्या तालावर नाचत होते. तुम्ही-आम्ही सामान्य लोक काहीही करू शकत नाही.

ज्या भागातून या मिरवणुका गेल्या, त्या भागातून शारीरिक व्याधींच्या तक्रारी येण्यास सुरुवात झालेली आहे. 'डॉक्टर, माझ्या कानात शिटी वाजल्याचा आवाज येत आहे,' असे कोणी म्हणत आहे, कुणाला कमी ऐकू येते आहे, कुणाचा कान दुखत आहे, तर कुणाला चकरा येत आहेत. या वर्षी गणपती विसर्जन मिरवणुकीत कानठळ्या बसवणार्या डीजेचे आवाज आणि ढोल-ताशांच्या आवाजाने उच्चांक गाठला होता. याशिवाय अनेक गणेश मंडळांनी आनंदाने बेभान होत गुलालाची उधळण केली. त्यामुळे लहान मुले आणि ज्येष्ठ मंडळींना श्वसनाच्या विकारांनाही सामोरे जावे लागले आहे.

सामान्य माणसाचे कान ७५ ते ८० डेसिबलपर्यंतचा आवाज सहन करू शकतात. डेसिबल हे आवाज किती आहे, याचे मानक आहे. गर्दीच्या ठिकाणी आपण साधारणतः ११० डेसिबलपर्यंत आवाज सहन करू शकतो आणि ११० डेसिबलच्या पुढे आवाजाची पातळी गेल्यास कानावर परिणाम होतो. विसर्जन मिरवणुकीमध्ये ध्वनी प्रदूषण डेसिबलमध्ये मोजले असता, ते १२० पेक्षाही पुढे जाताना दिसले आहे. अर्थात, याचे परिणाम होणारच होते. काही लोकांच्या कानात शिटीचा आवाज आला, तर काही लोकांच्या आयुष्याचीच शिटी वाजली. अशी ही आपली गणेश विसर्जन मिरवणूक होती. याशिवाय कान सुन्न पडणे, कान दुखणे, ऐकायला कमी येणे हे पण प्रकार दिसून येत आहेत. गणेश विसर्जन मिरवणुकीत तरुणाई बेभान होऊन नाचत होती; पण त्याचे परिणाम त्या भागातील जनता आता अनुभवत आहे. आम्हीही गणेश विसर्जन मिरवणूक पाहण्यास गेलो होतो. तिथे काही लोक आपल्या बालकांना कडेवर घेऊन आले होते आणि कौतुकाने त्यांना ती मिरवणूक दाखवत होते. आम्हास आश्चर्य याचे वाटले की, या लहान बालकांच्या कानांवर काही परिणाम होईल, याचे भान त्यांच्या पालकांना पण नाही? आपल्या बाळाच्या कानांवर परिणाम होईल याची ज्यांना माहिती नाही, त्यांना सुजण पालक म्हणावे तरी कसे? प्रत्येक मिरवणुकीमध्ये कार्यकर्ते कुणा ना कुणा तरी राजकीय पक्षाला बांधील असतात. सन्माननीय अपवाद वगळता कुणाही राजकीय नेत्याने एवढ्या मोठ्या आवाजात डीजे वाजवू नका, असे सांगितलेले दिसून आले नाही.

# डाळिंब पिकातील फळ पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी करा हे सोपे उपाय

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक**
**कृषि विशेष**

डाळिंब झाडास वर्षातून केंव्हाही फुले येतात. त्यामुळे मृग बहार (जून-जुलै), हस्त बहार (सप्टेंबर-ऑक्टोबर), (आंबे बहार जानेवारी-फेब्रुवारी) यापैकी व्यापारीदृष्ट्या तसेच बाजारातील विविध फळांची उपलब्धता पाहून कोणताही बहार घेता येतो.

या फळपिकाला वर्षभर फुले व फळे येतात त्यामुळे किडिंना सतत खाद्य उपलब्ध होत असल्याकारणाने किडींचा प्रादुर्भाव सातत्याने वाढलेला दिसून येतो. यासाठी किटकनाशंकाचा कमीत कमी वापर करून एकात्मिक पद्धतीने कीड व्यवस्थापन केले पाहिजे.

**डाळिंब पिकातील फळ पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी करा हे सोपे उपाय**

डाळिंब फळपिकाला वर्षभर फुले व फळे येतात त्यामुळे किडिंना सतत खाद्य उपलब्ध होत असल्याकारणाने किडींचा प्रादुर्भाव सातत्याने वाढलेला दिसून येतो. यासाठी किटकनाशंकाचा कमीत कमी वापर करून एकात्मिक पद्धतीने कीड व्यवस्थापन केले पाहिजे.

डाळिंब झाडास वर्षातून केंव्हाही फुले येतात. त्यामुळे मृग बहार (जून-जुलै), हस्त बहार (सप्टेंबर-ऑक्टोबर), (आंबे बहार जानेवारी-फेब्रुवारी) यापैकी व्यापारीदृष्ट्या तसेच बाजारातील विविध फळांची उपलब्धता पाहून




विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

कोणताही बहार घेता येतो.

या फळपिकाला वर्षभर फुले व फळे येतात त्यामुळे किडिंना सतत खाद्य उपलब्ध होत असल्याकारणाने किडींचा प्रादुर्भाव सातत्याने वाढलेला दिसून येतो. यासाठी किटकनाशंकाचा कमीत कमी वापर करून एकात्मिक पद्धतीने कीड व्यवस्थापन केले पाहिजे.

**१) फळ पोखरणारी अळी**

डाळिंब फळपिकावरील ही सर्वात महत्वाची किड आहे. महाराष्ट्रामध्ये सर्वत्र आणि सतत कमी अधिक प्रमाणात आढळून येते. विशेषतः मृग बहारात ही किड जास्त प्रमाणात असते.

या किडीच्या अळ्या फळे पोखरून आतील भाग खातात व त्यांची विष्ठा फळाच्या पृष्ठभागावर आलेली दिसते.

फळामध्ये इतर बुरशी व जीवाणूंचा शिरकाव होऊन फळे कुजतात. अशा फळांना बाजारात किंमत मिळत नाही.

या किडीचा प्रादुर्भाव फुले लागण्याच्या वेळेस सुरू होतो. म्हणून या किडीचे व्यवस्थापनाच्या दृष्टीने फुलोऱ्याच्या अवस्थेपासून सुरूवात केली असता नियंत्रण चांगले होते.

या अळीचा प्रादुर्भाव मृग बहारामध्ये जास्त दिसून येतो. उष्ण तापमान, पाऊस व आर्द्रता किडीस पोषक ठरते.

**२) रस शोषणारा पतंग पतंग**

निशाचर असून दिसायला आकर्षक असतात. त्यांच्या मोठ्या आकारावरून आणि रंगावरून ते सहजपणे ओळखू येतात.

सर्वसाधारणपणे रात्री ८ ते ११ च्या दरम्यान या पतंगाचे बागेत प्रमाण जास्त दिसून येते.

पक्व फळ शोधून त्यावर बसून ते फळांना आपल्या सोंडेने सूक्ष्म छिद्र पाडून त्यात सोंड खुपसून आतील रस शोषून त्यावर उपजीविका करतात.

छिद्र पाडलेल्या जागेवर गोलाकार चट्टा तयार होतो आणि त्या जागी फळ सडण्यास सुरूवात होते.

अशी प्रादुर्भावाची फळे गळून पडतात.

फळांची प्रत कमी झाल्याने अशी फळे विक्रीयोग्य राहत नाहीत. या पतंगाचा प्रादुर्भाव तुलनात्मकदृष्ट्या आंबे बहार आणि मृग बहारात जास्त आढळून येतो.

**एकात्मिक व्यवस्थापन**

१) बाग स्वच्छ ठेवावी व तणांचा बंदोबस्त वेळीच करावा.

२) झाडांच्या छाटणीचे नियोजन अशा पध्दतीने करावे की जेणेकरून झाडांवर फांद्याची गर्दी होणार नाही तसेच फवारणी करतेवेळी किटकनाशकाचे द्रावण झाडाच्या संपूर्ण भागात पोहोचण्यास मदत होईल.

३) वर्षातून शक्यतो एकच बहार घ्यावा. इतर अवेळी येणारी फुले फळे तोडून नष्ट करावीत.

४) मृग बहारात किडींचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात असतो म्हणून शक्यतो मृग बहार घेणे टाळावे.

५) बागेतील कीडग्रस्त/ गळलेल्या फळांचा गोळा करून नाश करावा.


६) सायंकाळच्या वेळी बागेत धूर करावा.

७) प्रकाश सापळ्याचा वापर करावा जेणेकरून आकर्षित झालेले पतंग पकडून नष्ट करावेत.

८) फळांना पेपरबॅग किंवा कापडी पिशव्या बांधाव्यात.

९) रस शोषणारा पतंगासाठी विषारी आमिषाचा वापर करावा. त्याकरिता मॅलॅथिऑन ५० टक्के २० मि.ली. गूळ १०० ग्रॅम अधिक १०० ते १५० मि.ली. फळांचा रस + १ लिटर पाणी एकत्र मिश्रण करून १०० ते २०० मि.ली. बाऊलमध्ये टाकून हे बाऊल्स प्रति ८ ते १० झाडांच्या अंतरावर झाडांना बाहेरील बाजूस टांगून ठेवावेत. या विषारी आमिषात आकर्षित झालेले पतंग गोळा करून त्यांचा नाश करावा.



# जेवल्या जेवल्या झोपण्याचे हे आहेत गंभीर परिणाम

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक**

ऑफिसच्या कामाची वेळ हल्ली आठ तासांपेक्षा अधिक झाली आहे. काही वेळा तर आपण १२-१२ तास काम करतो. त्यामुळे साहजिकच घरी यायला उशीर होतो. पर्यायाने जेवणही उशिराच केले जाते. जेवण उशिरा झाले तरीही सकाळी पुन्हा ऑफिसची वेळ गाठण्यासाठी लवकर उठणे भागच असते.

परिणामी आपण जेवल्याजेवल्या लगेचच झोपतो. घरी राहाणाऱ्या लोकांमध्ये गृहिणींचे प्रमाण अधिक असते. त्या सकाळी लवकर उठून सर्व कामे उरकत असतात, त्यामुळे दुपारी जेवल्यानंतर थोडी वामकुक्षी त्या घेतात. दुपारची झोप, रात्री जेवल्या जेवल्या झोपणे या सर्व गोष्टी आरोग्याच्या दृष्टीने अर्थातच घातक आहेत.

कारण या सवयींमुळे काही गंभीर आजार जडू शकतात. जेवल्या जेवल्या झोपण्याची सवय ही शरीर स्थूल करण्यास कारणीभूत ठरते. रात्री उशिरा ऑफिसवरून घरी आले की थकला भागला जीव कधी एकदा जेवतोय आणि पाठ टेकतोय असाच विचार करतो. साहजिकही आहे. सकाळी वेळेत ऑफिसलाही पोहोचायचे असते.

रहाटगाडगे सुरूच असते. परंतु, जेवल्या जेवल्या झोपणे हे आरोग्यासाठी घातक आहे. दुपारीही जेवण करून झोपणे अहितकारकच आहे. जेवण आणि झोप यांच्यामध्ये किमान दोन तासाचा वेळ असला पाहिजे.

जेवल्या जेवल्या झोपल्याने काय नुकसान होऊ शकते ते जाणून घ्या. जेवल्या जेवल्या झोपल्यास अन्नपचनास त्रास होतो. त्यामुळे पोटात तसेच राहिलेल्या अन्नाचे रूपांतर चरबीमध्ये होते. परिणामी वजन हळूहळू वाढते. पोटात अन्न साठल्याने अन्नाचे पचनही हळूहळू होते. त्यामुळे शरीराची चयापचय क्रियाही कमजोर होते.

जेवण पचण्यासाठी आतड्यांमध्ये आम्ल तयार होते परंतु जेवल्यानंतर लगेच झोपल्यास अन्नपचनासाठीचे हे आम्ल पोटातून निघून अन्ननलिकेत येते, फुफ्फुसांपर्यंत पोहोचते. परिणामी व्यक्तीला पोटामध्ये जळजळ होणे आणि पित्त होणे आदी समस्या भेडसावतात. जेवल्यानंतर लगेचच आडवे झाल्याने पोट जड होते. झोपही शांत लागत नाही. जरी झोप लागली तरीही पोटाच्या जडत्वामुळे झोप शांत न लागता मध्ये मध्ये मोडते, नियमितपणे झोपेत असा खंड पडत राहिल्यास झोपेच्या समस्या भेडसावतात.जेवल्यानंतर शरीरातील ग्लुकोजची पातळी वाढते, परंतु लगेच झोपल्यास त्या रक्तशर्करेचा वापर शरीर करू शकत नाही. मग रक्तामध्ये जास्त प्रमाणात शर्करा मिसळली जाते. यामुळे व्यक्तीला मधुमेह होण्याचा धोका वाढतो. आरोग्यशास्त्रानुसार रात्रीच्या झोपण्यापूर्वी किमान दोन तास आधी जेवण करावे. जेवल्यानंतर न चुकता शतपावली करावी. त्यामुळे खाल्लेले अन्न पचण्याची प्रक्रिया सुलभ होते आणि स्थूलपणालाही आमंत्रण मिळत नाही. तसेच झोपही शांत लागते.

# मंजुराती नुसार तात्काळ दुसरे कौटुंबिक न्यायालय सुरु करा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अमरावती**

अमरावती सारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या महानगर पालिका क्षेत्रासाठी केवळ एक कौटुंबिक न्यायालय दीर्घ कालावधीच्या तारखा देऊन पीडित महिलांचे शोषण करणारी शोभेची वस्तू बनली आहे.

अमरावती येथे दोन कौटुंबिक न्यायालयाची परवानगी असताना सरकारी उदासीन धोरणामुळे केवळ एकच न्यायाधीश व समुपदेशक यांच्या भरवश्यावर प्रचंड कामाचा बोझा वाहिला जात आहे. कौटुंबिक न्यायालयात पीडित महिला वर्ग मोठ्या आशेने दाद मिळेल म्हणून धाव घेत असतात परंतु प्रत्यक्षात अमरावती कौटुंबिक न्यायालय सर्रास दोन ते पाच महिन्या नंतरची तारीख देऊन त्यांच्या हक्काची हेळसांड करीत आहे. मंजुराती नुसार तात्काळ दुसरे कौटुंबिक न्यायालय अमरावती महानगर पालिका क्षेत्रासाठी तात्काळ सुरू करावे अशी मागणी पीडित महिला वर्गाकडून होत आहे.

# मोर्शीत १ ऑक्टोबरपासून एक दिवसाआड पाणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ मोर्शी**

येथील नगर परिषदेकडे थकीत असलेले वीज बिल व ग्राहकाकडून येणारी अत्यल्प वसुली यामुळे वीज कपातीसाठी मोर्शी शहराला १ ऑक्टोबरपासून एक दिवसाआड पाणी पुरवठा करण्याचा न निर्णय पालिका प्रशासनाने घेतल्याची माहिती मुख्याधिकारी पराग वानखडे यांनी दिली. त्यामुळे मोर्शीकरांना पाणी वापरामध्ये काटकसर करावी लागणारआहे.जवळपास ३५ हजार लोकसंख्या असलेल्या मोर्शी शहराला सद्यःस्थितीत दैनंदिन पाणीपुरवठा केला जात आहे. याकरिता दररोज मोठ्या प्रमाणात विजेचा वापर केला जातो. परिणामी नगर परिषदेला दरमहा १५ ते २० लाख रुपये वीज बिल भरावे लागते. त्यातच पाणी कराची वसुली फार कमी आहे. त्यामुळे दरमहा वीज बिल भरणे व




पाणीपुरवठा व्यवस्थापनावर होणारा खर्च याचे नियोजन करणे आवश्यक आहे. त्याकरिता वीज वापर कपात करणे आवश्यक आहे.एकीकडे मोर्शीत दैनंदिन पाणीपुरवठा होत असताना दुसरीकडे मात्र शहरातीलच काही भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाण्याचा अपव्यय सुद्धा होत आहे. यामुळे नगर परिषदेमार्फत होणारा पाणीपुरवठा १ ऑक्टोबरपासून एक दिवस आड करण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी पराग वानखडे यांनी सांगितले.

मोर्शी शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी दोन पाण्याच्या टाक्या - आहेत. यातील जुनी टाकी शिकस्त झाली आहे. या टाकीतून सकाळच्या सत्रात जुन्या वस्तीमध्ये, तर दुपारी कॉलनी परिसरास पाणी पुरवठा केला जातो. १ ऑक्टोबरपासून एक दिवसाआड पाणी पुरवठा केला जाणार असल्याने नागरिकांना आता पाणी काटकसरीसह साठवणूकही करावी लागणार आहे.

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# अप्पर वर्धा धरणाचे ९ गेट उघडले

## वर्धा नदीच्या पात्रात ५१४ घन.मी.से.ने पाण्याचा विसर्ग : नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ मोर्शी**

पश्चिम विदर्भातील सर्वात मोठ्या अप्पर वर्धा धरणाचे १३ पैकी ९ गेट रविवारला रात्री ८ वा. ३५ सेंटिमीटरनेउघडण्यात आली. त्यामधून ५१४ घनमीटर प्रतिसेकंद पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात येत आहे.वर्धानदीचे पाणलोट क्षेत्र हे मध्यप्रदेशात आहे. या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस कोसळत असल्यामुळं मध्य प्रदेशातील जाम आणि माडु नदीला आलेल्या पुर आला असून यामुळे अप्पर वर्धाच्या पातळीत वाढ झाल्याने हा विसर्ग करण्यात येत आहे.

जिल्ह्यासाठी वरदायिनी असलेल्या अप्पर वर्धा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या संततधार पाऊस सुरू झाला आहे. त्यामुळे अप्पर वर्धा धरणाच्या जलसाठ्यात मोठ्या प्रमाणात वाढहोत आहे. ही बाब लक्षात घेऊन रविवारला रात्री धरणाची ९ दारे उघडण्यात आली.उर्ध्व वर्धा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रामधे जोरदार पाऊस सुरू झाल्यामुळे जलाशय पातळी ३४२ मी. (१००%) पर्यंत गेली होती. ही पातळी नियंत्रणात ठेवण्यासाठी रविवारला ८ वा. पासून वर्धा नदी पात्रात विसर्ग २०५ घन.मी/से. वरून वाढवून आता ५१४ घन.मी/से. एवढा करण्यात आहे. तसेचसध्याच्यास्थितीत९ दरवाजेप्रत्येक ३५ से.मी. मधून एकूण विसर्ग ५१४ घन. मी/से पाणी वर्धा नदी पात्रात सोडण्यात येत आहे.

# १४९ दुकाने, १७ स्वागत गेट उभारण्यात येणार नवरात्री यात्रेची मनपा प्रशासनाची तयारी सुरु

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ अमरावती**

गुरुवार ३ ऑक्टोंबरपासून अंबादेवी आणि एकविरा देवी नवरात्री उत्सवाचा शुभारंभ होत आहे. यानिमित्त ९ दिवस राजकमल चौक ते गांधी चौक रोडच्या दुतर्फा मोठी यात्रा भरते. देवींच्या दर्शनासाठी अमरावती शहरातूनच नव्हे तर जिल्ह्यातून तसेच राज्यभरातून भाविक दरवर्षी येतात. त्यामुळे या यात्रेत रोडच्या दुतर्फा दुकाने सजतात. यावर्षी यात्रेत ५ बाय ७ फुट आकाराचे १४९ दुकान लावण्यात येणार आहेत. सोबतच १७ स्वागत कमानी उभारण्यात येणार असून आतापर्यंत मोफत असलेल्या या गेटचे सुद्धा यावर्षी लिलाव होणार आहे. याबाबतचे रेट सोमवार २३ सप्टेंबर मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांच्या मार्गदर्शनात फायनल ठरविण्यात येणार आहे.

## यावर्षी प्रथमच स्वागत गेटचा लिलाव होणार



दरवर्षी यात्रेत रोडच्या दुतर्फा दुकानासाठी प्लॉट उपलब्ध करून देण्यात येते. गेल्या वर्षी १५१दुकांनाचा लिलाव करण्यात आला होता. यामधून मनपाला १४.५० लाखांचे उत्पन्न प्राप्त झाले होते. यावर्षी १४९ दुकानांची व्यवस्था करण्यात आली असून दरामध्ये सुद्धा ६००० रुपयांवरून १० टक्के वाढ म्हणजे ६६०० रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. सोबतच आतापर्यंत उभारण्यात येणाऱ्या स्वागत कमानी प्रथमच लिलाव करून देण्यात येणार आहे. यासाठी १००० रुपये अर्जाचीकिंमत आणि ५०० रुपये लिलावात बोली बोलण्यासाठी आकारण्यात येणार आहे.

### एकूण १७ स्वागत गेट उभारणार

राजकमलतेगांधी चौक दरम्यान गेल्या वर्षी ९ कमानी उभारण्यात आल्या होत्या. त्यासाठी मनपाकडून कोणत्याच प्रकारचे शुल्क आकारण्यात आलेनव्हते. दुकांना भाडे आणि तर याच ठिकाणी मोठमोठ्या कमानी उभारणाऱ्यां कडून एक रुपया सुद्धा भाडे वसुल करीत नाही. पोटापाण्यासाठी, रोजगारासाठी रोडवर बसलेल्यांकडून भाडे वसुली तर केवळराजकीय हव्यासापोटी चमकोगिरी करणाऱ्यांवर 'मोफत' मेहेरबानी... मनपाची अशी दुटप्पी भूमिका का ? त्यांच्याकडून भाडे आकारणी का नाही ? अशा आशयाचे वृत्त आम्ही वृत्त केसरीच्या १५ ऑक्टोंबर २०२३ रोजी प्रकाशितअंकात केलेहोते, हे विशेष. याचीच दखल घेत आता यावर्षी स्वागत कमानीचे लिलाव होणार असल्याची माहिती आहे.

### विधानसभा निवडणुमुळे स्पर्धा

विशेष म्हणजे कोणत्याही क्षणी राज्यात विधानसभा निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे. यामुळे स्वागत गेट उभारण्यासाठी आतापासूनच मनपाकडे संपर्क साधल्याची माहिती आहे. त्यामुळे मनपा प्रशासनाने पुढील विवाद टाळण्यासाठी आतापर्यंत मोफत असलेले स्वागत गेट लिलावाच्या माध्यमातून देण्याचा निर्णय घेतला असून उत्पन्न सुद्धा प्राप्त होणार आहे.

# १९ सप्टेंबर ते २२ ऑक्टोबरपर्यंत बुध ग्रह राहणार सूर्याच्या सान्निध्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २३अमरावती**



सूर्यमालेतील सर्वात लहान ग्रह बुध हा सूर्याच्या सान्निध्यात राहणार असल्याने १९ सप्टेंबरपासून २२ ऑक्टोबरपर्यंत आकाशात दिसणार नाही, तसाही हा आंतरग्रह असल्याने नेहमीच सूर्याच्या सान्निध्यात असतो. त्यामुळे पूर्व किंवा पश्चिम क्षितिजावर फार कमी वेळ दिसत असल्याची माहिती खगोल अभ्यासकांनी दिली.

ही एक खगोलीय घटना आहे. ४ किंवा ६ इंच टेलिस्कोपमधून हा ग्रह ठिपक्यासारखा दिसतो. सध्या हा ग्रह कन्या राशीत असून १९ ऑक्टोबरला तूळ राशीत असेल, त्यामुळे दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये हा ग्रह संध्याकाळी पश्चिम आकाशात दिसू शकेल. याचे अवलोकन करण्यासाठी दुर्बिण असल्यास अधिक उत्तम निरीक्षण करता येणार आहे.

सन १९७४ मध्ये पहिले मानवरहित यान 'मरिनर-१०' या ग्रहावर गेले तर सन २००८ मध्ये 'मेसेंजर' या यानाने बुधाचा अभ्यास केला. या ग्रहावर 'द स्पायडर' नावाचे सर्वात मोठे विवर आहे. टेलिस्कोपमधून या ग्रहाच्या चंद्राप्रमाणे सुंदर कला दिसत असल्याची माहिती हौशी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर यांनी दिली.

**सूर्यापासून बुधाचे अंतर ५.८ कोटी किमी**

बुध हा ग्रह सूर्यापासून जवळचा ग्रह आहे. या ग्रहाला उपग्रह नाही. हा ग्रह सूर्याला ८८ दिवसात एक चक्कर मारतो म्हणजेच सर्वात वेगवान ग्रह आहे. सूर्यापासून या ग्रहाचे अंतर हे ५.८ कोटी किमी असल्याची माहिती मराठी विज्ञान परिषद अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर यांनी दिली.

# मुख्यमंत्रिपदाबाबत बाळासाहेब थोरातांचं विधान; नाना पटोलेंच्या नावाला विरोध?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नागपूर**

आमच्या प्रत्येकाचे उत्साही कार्यकर्ते असतात, त्यांच्या अपेक्षा असतात. शेवटी राजकारण हे महत्त्वाकांक्षेवर चालते. त्याप्रकारे कार्यकर्त्यांची महत्त्वाकांक्षा असते. सर्वपक्षात हे आहे. मुख्यमंत्री झाला पाहिजे हा कार्यकर्त्यांचा आग्रह असतो अशाप्रकारे काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी विधान केले आहे. नाना पटोले मुख्यमंत्री व्हावेत असा सूर काँग्रेसच्या नेत्यांकडून विदर्भाच्या बैठकीत निघाला होता. त्यावर पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बाळासाहेब थोरातांनी ही प्रतिक्रिया दिली.

बाळासाहेब थोरात म्हणाले की, आमचे उत्साही कार्यकर्ते असतात निरनिराळ्या ठिकाणी वेगवेगळी नावे येत असतात त्यामुळे ते काही मानण्याचं कारण नाही. मुख्यमंत्रिपदाबाबत कार्यकर्त्यांनी ती अपेक्षा करणं हे वावगं नसते, मात्र मुख्यमंत्रिपदाबाबत आमचा जो निर्णय होईल तो आघाडी म्हणून होईल. आघाडीचा निर्णय आम्हाला मान्य असेल. मुख्यमंत्रिपदाबाबत आम्हाला वादाचा मुद्दा करायचा नाही. आम्ही आज त्यावर काहीच चर्चा करत नाही



मुख्यमंत्रिपदाबाबत आम्ही अगोदर काही ठरवले नाही. महाविकास आघाडीचा जो काही निर्णय असेल तो योग्यवेळी होईल असं त्यांनी सांगितले.

**नाना पटोलेंच्या नावाची चर्चा**

नाना पटोले यांनी लोकसभेत काँग्रेसला मोठे यश मिळवून दिले होते. विधानसभेत ते राज्यात करिष्मा करतीलच. मात्र, विदर्भात सर्वात जास्त जागा जिंकून देतील व तेच मुख्यमंत्री असतील असा विश्वास काँग्रेसच्या बहुतांश नेत्यांनी व्यक्त केला. विदर्भात काँग्रेस नेत्यांची बैठक झाली, त्यात सर्वांनी हेच मत मांडले. अतुल लोंढे, अभिजीत वंजारी, अनिस अहमद यांनी हा मुद्दा मांडला व नितीन राऊत, सतीश चतुर्वेदी यांनीदेखील याला दुजोरा दिला.

**.....तर मुख्यमंत्रिपद खेचून आणू**

नाना पटोलेंनी मेहनत घेतली, विधानसभा अध्यक्षपद सोडून संघटनेचे पद घेतले, दारोदारी फिरले, राज्यात फिरले आणि काँग्रेसला चांगले दिवस आले. नाना पटोलेंमुळे हे यश मिळाले असून त्याचे बक्षीस त्यांना द्यायला हवं. नाही मिळाले तर विदर्भवाले हिसकावून घेऊ. जो मेहनत करेल त्याला फळ मिळायला हवे, ती लढाईही आपल्याला लढावी लागेल असं सांगत विकास ठाकरेंनी मुख्यमंत्रिपदावर भाष्य केले.

# १५ दिवसांच्या ब्रेकनंतर पुन्हा ॲक्टिव्ह

## विजांच्या कडकडाटात शहरासह जिल्ह्यात पावसाची हजेरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

हवामान विभागाने पावसाचा व्यक्त केलेला अंदाज खरा ठरला असून १५ दिवसांच्या विश्रांतीनंतर शहरासह जिल्ह्यात पुन्हा एकदा पावसाने हजेरी लावली आहे. मध्यरात्रीपासून ते दुपारी १२ वा. पर्यंत जिल्ह्यातील बहुतांश ग्रामीण भागात तर सायंकाळी ४ वा. पासून अमरावती शहरात पावसाने हजेरी लावल्याने उकाड्यापासून दिलासा मिळाला. तर पाणी पाणी करीत असलेल्या सोयाबीन पिकाला या पावसाचा चांगलाच फायदा होणार असल्याने शेतकऱ्यांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे. अमरावतीसह विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्या चा वारा (३०-४० किमी प्रतितास वेग) आणि मध्यम पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. रविवारी विदर्भात येलो अलर्ट देण्यात आला होता.



त्यानुसार अमरावती जिल्ह्यात पुन्हा मान्सून ॲक्टिव्ह झाल्याचे चित्र रविवारला दिसले.

मध्यरात्री पासून ते सायंकाळपर्यंत... शनिवारला रात्रीच्या वेळी अमरावती शहरात पावसाने हजेरी लावली होती. त्यानंतर मध्यरात्री जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर, चांदुर रेल्वे, धामणगाव रेल्वे, तिवसा, मोर्शी, चांदुर बाजार, अचलपूर तालुक्यातील काही भागात पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.गेल्या १५ दिवसांपासून पावसाने ब्रेक घेतल्याने कडक झालेल्या जमीनीला भेगा पडल्या होत्या. त्यामुळे सोयाबीनच्या पिकांच्या मुळांना हवा लागल्याने पिके पिवळी व शेगा अर्धवट अवस्थेत भरायच्या राहते की काय, अशी स्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे सोयाबीनच्या पिकात मोठी घट होण्याचे दिसत होते. मात्र शनिवारला मध्यरात्री झालेल्या पावसामुळे सोयाबीनच्या पिकाला फायदा झाला असून शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. कपाशी पिकाच्या .. वाढत्या उन्हामुळे फुले कळ्या, पात्या गळत होत्या. या पावसामुळे कपाशी पिकाला फायदा झाला आहे.जिल्ह्यात आज सकाळी सुद्धा ढगाळ वातावरण असून पावसाची शक्यता आहे.

# इंटॅक तर्फे अमरावती परकोट हेरिटेज वॉक संपन्न : ४५ इतिहास वारसा प्रेमी विद्यार्थी व नागरीकांनी सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २३अमरावती**

अमरावती शहराला ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली असून भगवान श्रीकृष्णांच्या काळापासूनचा इतिहास या शहराला लाभला आहे. या इतिहासाचे अनेक अवशेष अमरावती जिल्ह्यात शहारामध्ये अस्तित्वात आहेत तसेच संपूर्ण शहराला २०० वर्षे पुरातन परकोट सुद्धा आहे. या परकोटाचा व अमरावती शहराचा इतिहास येथील विद्यार्थांना व नागरिकांना माहिती व्हावा या करिता इंटॅक अमरावती चॅप्टर तर्फे अमरावती किल्ला हेरिटेज वॉक या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. परकोट परिक्रमेची सुरुवात अंबा गेट येथून करण्यात आली. सर्वप्रथम इंटॅक सदस्य किरण मोरे यांनी उपस्थितांचे स्वागत करून इंटॅक संस्थेची माहिती देऊन परिक्रमा मार्गदर्शक डॉ. जयंत वडतकर यांचा परिचय करून दिला.अमरावतीच्या भुईकोट किल्ल्याचे बांधकाम १८२१ ला पुर्ण झाले यास २०० वर्षे पुर्ण




झालेत. या किल्ल्याच्या निर्मितीचा इतिहास, त्याचे महत्त्व व त्याची रचना या बाबत डॉ. जयंत वडतकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी इतिहास विषयाचेप्रा.श्रीनिवास सातभाई तसेच प्रा.बी.आर. मस्के यांनी सुद्धा अमरावती इतिहास आणि परकोट बांधकाम या बाबतची माहिती उपस्थितांना दिली.अंबादेवी दरवाजा पासून परिक्रमा सुरु करुन पुढे जवाहर दरवाजा, नागपुरी दरवाजा, खुनारी खिडकी (मदिना गेट), धर्मशाळा, संपूर्ण परकोट, सर्व बुरुज, माता खिडकी, छत्रपुरी खिडकी, खोलापुरी गेट असा दोन तासांचा अमरावती किल्ला दर्शनाचा मनोरंजक आणि माहितीपूर्ण पायी प्रवास डॉ.जयंत वडतकर यांनी सहभागी इतिहास प्रेमींना घडवून आणला.या उपक्रमात इतिहास विभाग प्रमुख डॉ. घनश्याम महाडिक, प्रा.श्रीनिवास सातभाई, प्रा.बी.आर. मस्के, डॉ. गोविंद तिरमनवार, डॉ. लक्ष्मण मस्के ,डॉ. विश्वनाथ बीटे, प्रा. अभिजित मेंढे तसेच प्रशासकीय अधिकारी श्री आशिष बिजवल यांनी सक्रीय सहभाग घेतला. शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेतील विद्यार्थ्यांनी तसेच अमरावती शहरातील नागरिक, विद्यार्थी यांनीही मोठया संख्येने उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला व आपल्या शहराचा इतिहास जाणून घेतला. सदर परिक्रमा इतिहास तज्ञ तथा वन्यजीव अभ्यासक डॉ. जयंत वडतकर यांच्या मार्गदर्शना मध्ये करण्यात आली. डॉ. वडतकर यांनी मार्गदर्शन करत असताना २०० वर्षाचा परोकोटाच्या इतिहास उलतगडत असताना परकोटला एकूण ५ दरवाजे व ४ खिडक्या असल्याची माहिती व त्याचे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून महत्व विषद केले. सदर परिक्रमा कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी इंटकचे सदस्य किरण मोरे, अंकुश गावंडे, मनिष ढाकुलकर, प्रा. अंकुश खंडारे, मयुर चौधरी, अमेय ठाकरे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमात एकूण ४५ इतिहास वारसा प्रेमी विद्यार्थी व नागरीकांनी आपला सहभाग नोंदविला.

# मेळघाट मधील सेमाडोह जवळ भरधाव खासगी प्रवासी बस पुलावरुन नदीत कोसळली

## ६ प्रवाशांचा मृत्यू, २५ प्रवाशी जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ सेमाडोह**

अमरावतीहून धारणी येथे जात असलेली खासगी प्रवासी बस सेमाडोह नजीक पुलावरून कोसळून झालेल्या भीषण अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला असून २५ प्रवासी जखमी झाले आहेत. सात जण गंभीर जखमी असल्याने त्यांना अमरावतीच्या जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले आहे. उर्वरित १८ जखमींवर अचलपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

घटनास्थळीत चार जण दगावले होते तर दोघे उपचारासाठी रुग्णवाहिकेतून परतवाड्याच्या दिशेने निघाले असतानाच रस्त्यात दगावल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली.अपघातानंतर तत्काळ मदत कार्य सुरू



करण्यात आले. अपघात घडताच सेमाडोह येथील रहिवासी घटनास्थळी धावून गेले. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे कर्मचारी देखील घटनास्थळी पोहोचले. नदीत कोसळलेल्या अपघातग्रस्त बसमधील प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. या अपघाताची माहिती परतवाडा, चिखलदरा आणि धारणी पोलिसांना देण्यात आली. बचाव पथक अपघात स्थळी पोहचले आहे. अपघाताचे कारण शोधण्यासाठी तपास सुरू केला आहे. अपघातस्थळी स्थानिक पोलिस अधिकारी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून मदतकार्य पूर्ण केले.या मार्गावर अनेकदा अशा घटना घडतात. वळण रस्त्यावरील अपघातांचा धोका लक्षात घेता प्रशासनाने या मार्गावर अधिक सुरक्षा उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. प्रवाशांसाठी योग्य सूचना फलक आणि रस्त्याचे व्यवस्थित देखभाल आवश्यक आहे, असे स्थानिक नागरिकांनी सांगितले. यापुर्वीही या मार्गावर अनेक अपघात घडले आहे. परतवाडा ते धारणी हा मार्ग घाट वळणाचा आहे. रस्ता अरूंद आहे. पुलावर चालकांना काळजी घ्यावी लागते. थोडेही दुर्लक्ष हे प्राणघातक ठरू शकते.

गेल्या २४ मार्च रोजी सेमाडोह नजीक एसटी महामंडळाची बस खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातात दोन महिलांचा मृत्यू झाला होता, तर २५ जण जखमी झाले होते. बसचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला होता. अमरावती वरून निघालेली परतवाडा आगाराची एम एच ०७ / ९४७८ क्रमांकाची बस परतवाडा घटांग, सेमाडोह मार्गे तूकईथड येथे जात असताना हा अपघात झाला होता. सेमाडोह नजीक जवाहर कुंड येथे ही बस सुमारे ३० फूट खोल दरीत कोसळली होती.धारणी येथील वसंतराव नाईक महाविद्यालयातून नुकतेच सेवानिवृत्त झालेले राजेंद्र पाल बाबू यांच्यासुद्धा मृतकांमध्ये समावेश आहे. तर अपघातात महिला शिक्षक सुद्धा जखमी झाल्या आहेत.

# जखमी रुग्णांना पुढाऱ्यांनी दिला धिर......



**मेळघाट मधील सेमाडोह जवळ भरधाव खासगी प्रवासी बस पुलावरुन नदीत कोसळली यात ६ जणांचा दुर्दैवी मृत्यु ज़ाला तर ,५ प्रवासी गंभीर जखमी तर २५ किरकोळ जखमी आहेत जखमी रुग्णांवर अचलपुर व् अमरावती येथे उपचार सुरु आहे या जखमींची चौकशी व् त्यांना धीर देण्याचे काम जिह्याचे खासदार बळवंत वानखड़े आमदार बच्चू कडु व नवनीत राणा यांनी केले.**

# भाजप नेते तुषार भारतीय यांचे संवाद बैठकीचे आयोजन

## विधानसभा निवडणुकीसाठी दंड थोपटले




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३भातकुली**

बडनेरा विधानसभा मतदार संघ संवाद बैठकीचे आयोजन भातकुली तालुका भाजपा च्या वतीने श्री क्षेत्र ऋणमोचण येथे रविवार दिनांक २२ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते.या सवांद बैठकीचे अध्यक्ष तुषार भारतीय हे होते

या सवांद बैठकीच्या माध्यमातून तुषार भारतीय यांनी येत्या विधानसभा निवडणुकीसाठी आपले दंड थोपटले आहे.त्या अनुषंगाने त्यांची तयारी जोरदार सुरू आहे.

तुषार भारतीय यांच्या नेतृत्वात रविवारी भातकुली तालुम्यातील सर्व भाजप पदाधिकारी व कार्यक्रयत यांचा सोबत संवाद बेठकी चे आयोजन करण्यात आले होते.या बेठकीत त्यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्या ची संवाद साधत त्यांची मते जाणून घेतली.

यावेळी भारतीय यांनी रवि राणा यांच्यावर जोरदार टीका केली ते म्हणाले मागील १५ वर्षात बडनेरा विधानसभा मतदार संघामध्ये आमदार नाही तर सावकार निवडून दिले होते.आमदाराला प्रत्येक वर्षाला १० कोटी रुपये मिळते ,१५ वर्षात १५० कोटी रुपये गेले कुठे अशा प्रश्न यावेळी उपस्थित केला.वसुली अधिकारी अशी तुलना सुद्धा यावेळी रवि राणा यांची केली.

# पीक विमा कंपनीच्या प्रतिनिधीला शेतकऱ्यांनी धो-धो धुतले

## शेतीचे नुकसान जास्त झाल्याचे दाखविणासाठी मागितले होते पाच हजार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ मोर्शी मंगरूळ**

अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यातील मंगरूळ गावात शेतीच्या पिकाचे नुकसान जास्त दाखवण्यासाठी शेतकऱ्यांकडून पैसे उकळणाऱ्या पीक विमा कंपनीच्या प्रतिनिधीला शेतकऱ्यांनी आज चांगलाच चोप दिला. या घटनेमुळे पीक विमा कंपनीच्या प्रतिनिधी मध्ये चांगलीच खळबळ उडाली.



अमरावती जिल्हयात सततचा पाऊस व अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. एक रुपयामध्ये पीकविम्यात सहभाग घेता येत असल्याने विभागातील २८.७२ लाख शेतकऱ्यांनी पीकविम्यात सहभाग घेतला आहे. त्यातच पावसाची सरासरी १२१ टक्क्यांवर पोहोचली आहे. जुलै महिन्यापासून सुरू झालेली पावसाची रिपरिप अद्याप थांबलेली नाही. मुसळधार पाऊस, अतिवृष्टीने नदी–नाल्यांना पूर येऊन पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

शिवाय शेतात पाणी साचूनही पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे विहित मुदतीत म्हणजेच नुकसान झाल्याचे ७२ तासांच्या आत विभागातील ७ लाख ५३ हजार ६१० शेतकऱ्यांनी संबंधित पीकविमा कंपनीकडे पूर्वसूचना अर्ज दाखल केलेले आहेत. कंपनीद्वारा सर्व्हे करण्यात येऊन पीकविम्याचा परतावा देण्यात यावा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.मात्र जिल्ह्यात काही पीक विमा एजंट हे भोळ्या बाभड्या शेतकऱ्यांकडून पैसे मागतात अशीच एक घटना आज दि.२३रोजी मोर्शी तालुक्यातील मंगरूळ गावात घडली या ठिकाणचे शेतकरी अनिकेत मोहोड यांच्या सात एकर सोयाबीनचे नुकसान जास्त दाखवण्यासाठी विमा कम्पनीच्या प्रतिनिधीने ५ हजार रु मागितले. व तुमचे नुकसान अधिक दाखवतो असे म्हणाला आधीच नुकसानीमुळे मेटाकुटीस आलेल्या शेतकऱ्याने काही मागे पुढे न पाहता विमा प्रतिनिधींची धुलाई करणे सुरु केले. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अमित अढाऊ हे सुद्धा आपल्या कार्यकर्त्यांसोबत घटनास्थळी पोहचले व कोणत्याही शेतकऱ्यांनी अधिकचे पैसे पीक विमा प्रतिनिधीला देऊ नये असे आवाहन केले. यावेळी विमा प्रतिनिधीने माफी मागत आम्हला वरच्या अधिकाऱ्यांना पैसे द्यावे लागतात अशी कबुली दिली या वेळी आणखी एका अधिकाऱ्याला त्या ठिकाणी बोलाविण्यात आल्यानंतर दोघांनाही शेतकऱ्यांनी पोलिसांकडे सुपूर्त केले आता अधिक तपास पोलीस करीत आहे. मात्र या भोंगळ कारभाराकडे कृषी विभागाचे दुर्लक्ष असल्याचे दिसून आले.

# आजपासून परतीचा पाऊस सुरु होणार मराठवाडा-विदर्भाला झोडपून काढणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ अमरावती**

सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीला राज्यात चांगला पाऊस झाला होता. मात्र, गेल्या दोन ते तीन आठवड्यापासून पावसाने दडी मारली आहे. आता पुन्हा एकदा पावसासाठी पोषक वातावरण तयार झालं आहे. आजपासून परतीचा पाऊस सुरु होणार असून राज्यातील अनेक जिल्ह्यांना पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मराठवाडा आणि विदर्भातील बहुतांश जिल्ह्याला पाऊस झोडपून काढणार, अशी माहिती भारतीय हवामान खात्याने दिली आहे.

पूर्व, पश्चिम आणि मध्य विदर्भातही पावसाचा इशारा देण्यात आला आहे. बुलढाणा, वाशिम जिल्ह्यात आज आणि उद्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर अकोला व अमरावती जिल्ह्यांत २ ते ५ मिमी वादळी वाऱ्यासह तुफान पावसाचा इशारा देण्यात आला आहे. वर्धा व नागपूर जिल्ह्यात ६ ते ९ मिमी, तर यवतमाळ जिल्ह्यात १९ मिमीपर्यंत पावसाची शक्यता आहे. गोंदिया जिल्ह्यात ५ ते ७ मिमी, भंडारा जिल्ह्यात ४ ते ७ मिमी, चंद्रपूर जिल्ह्यात ११ ते १४ मिमी व गडचिरोली जिल्ह्यात १२ ते १४ मिमी पावसाची शक्यता आहे.पश्चिम महाराष्ट्रातील पुणे व नगर जिल्ह्यांत ५ मिमी, तर सांगली व सातारा, सोलापूर, कोल्हापूर जिल्ह्यातही दिवसभर पावसाची शक्यता आहे. पुणे व नगर जिल्ह्यांत ताशी १० ते १३ किमी राहील. दरम्यान, पुणे आणि नवी मुंबईतील काही भागात सोमवारी सकाळपासूनच पाऊस सुरु झाला आहे. त्यामुळे कामावर निघालेल्या चाकरमान्यांची चांगलीच तारांबळ उडाली आहे. आज दिवसभर असंच वातावरण राहण्याची शक्यता आहे.

# खगोलीय घटना : 'शनि'चे वलय काही काळ होणार अदृष्य

## यापूर्वी सन २००९ मध्ये घडली होती घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ अमरावती**

सूर्यमालेतील सर्वांत विलोभनीय कडी असणारा ग्रह म्हणजे शनि. यामुळे शनिचे वेगळेपण दिसून येते, परंतु शनिची ही कडा मार्च २०२५ पासून पृथ्वीवरून काही काळ दिसणार नाही. काही काळानंतर पुन्हा शनिची ही रूबाबदार रिंग पृथ्वीवरून पाहता येईल. यापूर्वी सन २००९ मध्ये अशी घटना घडली होती.

शनि व पृथ्वी यांच्या सापेक्ष स्थितीवर कड्यांचे दृश्य अवलंबून असते. ज्यावेळी पृथ्वी शनिच्या विषववृत्त पातळीत येते. त्यावेळी पृथ्वीवरून शनिची कडी दिसत नाही. अशावेळी शनिला एक अंधूक रेषा छेदत आहे. असा आपल्याला भास होतो. शनिची सुप्रसिद्ध रिंग पाहण्याची संधी केवळ यावर्षापुरतीच आहे.

पुढील वर्षी रिंग हरवून बसलेला शनि कसा दिसेल याची कल्पनाच करवत



नाही. सध्या शनि पृथ्वीच्या जवळ आहे. सूर्य मावळल्यानंतर रात्री ८ चे दरम्यान पूर्व क्षितिजावर दिसत आहे. हा ग्रह सध्या रात्रभर दिसत आहे. शनिची रिंग साध्या डोळ्यांनी दिसू शकत नाही. याकरिता मोठ्या टेलिस्कोपची आवश्यकता आहे. जिज्ञासूंनी व खगोलप्रेमिंनी दुर्बिनीतून शनिची रिंग पाहण्याची संधी सोडू नये, असे आवाहन मराठी विज्ञान परिषदेच्या अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर यांनी केले आहे.

### म्हणून शनिची कडी होणार गायब

खगोल अभ्यासकाच्या माहितीनुसार शनि २.५ अंशातून तर पृथ्वीचा अक्ष २३.५ अंशातून कलतो, अशावेळी कड्यांचे सुंदर दर्शन घडते. सध्या शनिची कडी पृथ्वीच्या प्रतलात येऊ लागली आहे. शनिची कडी पुढील वर्षी पृथ्वीच्या पूर्णपणे प्रतलात येईल. त्यामुळे काही काळ शनिची सुप्रसिद्ध रिंग पृथ्वीवरून दिसणार नाही.

# बत्तीस वर्षांत विदर्भाच्या मातीतून काँग्रेसचा एकही मुख्यमंत्री नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३नागपूर**

विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात काँग्रेसला 'अच्छे दिन' येणार असून मुख्यमंत्रिपद हे मेहनत करणाऱ्या नाना पटोले यांना मिळणार असल्याचं वक्तव्य काँग्रेसचे आमदार विकास ठाकरे यांनी केलं. मुख्यमंत्रिपद मिळालं नाही तर आम्ही ते हिसकावून घेऊ असंही ते म्हणाले. नागपुरात नाना पटोले यांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्षाची नागपूर शहरासाठीची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत अनेक काँग्रेस नेत्यांनी नाना पटोले हेच महाराष्ट्राचे पुढचे मुख्यमंत्री होतील, असे भाकित व्यक्त केलं. दरम्यान, आता या वक्तव्यावरुन महाविकास आघाडीच्या नेत्यांकडूनही प्रतिक्रिया उमटत आहे. असे असताना काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि माजी मंत्री नितीन राऊत यांनी अत्यंत सुचक वक्तव्य करत विकास ठाकरे यांच्या सुरात सुर मिसळवत अप्रत्यक्षपणे पाठिंबाच दिला आहे.



विदर्भाच्या मातीचा काँग्रेसचा एकही मुख्यमंत्री राज्यात गेल्या बत्तीस वर्षांत नाही. बहुजन समाजाचा मुख्यमंत्री तर अजिबात झालेला नाही. जेव्हा आमचे पक्ष नेतृत्व जातीय जनगणनेबद्दल विचार व्यक्त करतात आणि ते घटनेतही हे नमूद आहे की, जिसकी जितनी हिस्सेदारी उसकी उतनी भागीदारी असे असताना पक्षनेतृत्व (बहुजन समाजाचे नाना पटोले ) आमच्या कडे असेल, त्याबद्दल बोलण्यास वावगं काय? त्याबद्दल बोललंच पाहिजे. असे म्हणत मुख्यमंत्री पदासाठी नाना पटोले यांच्या दावेदारी संदर्भात काँग्रेसचे वरिष्ठ नेते नितीन राऊत यांनी अत्यंत सुचक वक्तव्य केलं आहे.